शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी आ. सुधीर मुनगंटीवार मैदानात; चंद्रपूर जिल्ह्यासाठी २४ तास अखंड कृषी वीजपुरवठ्याची मुख्यमंत्र्यांकडे मागणी.

कमी पावसामुळे निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर खरीप हंगाम संपेपर्यंत कृषी पंपांना विशेष बाब म्हणून अखंड वीजपुरवठ्याची मागणी.

शेतकऱ्यांचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान टाळण्यासाठी विशेष उपाययोजनांची विनंती; महावितरण, ऊर्जा विभाग आणि जिल्हा प्रशासनाला समन्वयाने कार्यवाही करण्याची सूचना.

चंद्रपूर : चंद्रपूर जिल्ह्यातील कमी पावसामुळे निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीत शेतकऱ्यांच्या पिकांचे संरक्षण व्हावे आणि त्यांच्या कष्टाचे पीक वाचावे, या संवेदनशील भूमिकेतून आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी ऊर्जा मंत्री तथा राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडे चंद्रपूर जिल्ह्यातील कृषी पंपांना खरीप हंगाम संपेपर्यंत विशेष बाब म्हणून २४ तास अखंड वीजपुरवठा उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे. वेळेवर सिंचनाची सुविधा उपलब्ध झाल्यास हजारो हेक्टरवरील पिके वाचतील आणि लाखो शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान टळेल, या उद्देशाने आ. मुनगंटीवार यांनी शासनाकडे तातडीने सकारात्मक निर्णय घेण्याची मागणी केली आहे.*

मुख्यमंत्र्यांना पाठविलेल्या निवेदनात आ. मुनगंटीवार यांनी नमूद केले आहे की, चंद्रपूर जिल्हा हा राज्यातील प्रमुख कृषिप्रधान जिल्ह्यांपैकी एक असून धान, सोयाबीन, कापूस, तूर तसेच इतर खरीप पिकांवर लाखो शेतकऱ्यांची उपजीविका अवलंबून आहे. यावर्षी मान्सूनचे आगमन वेळेत झाले असले तरी अपेक्षित प्रमाणात पाऊस झाला नसल्याने अनेक भागांत पावसाचा मोठा खंड पडला आहे. त्यामुळे जमिनीतील ओलावा झपाट्याने कमी झाला असून धान, सोयाबीन आणि कापूस पिके पाण्याअभावी करपू लागली आहेत. परिणामी उत्पादनावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

सध्या कृषी विद्युत पंपाद्वारे सिंचन हाच शेतकऱ्यांसमोरील एकमेव पर्याय आहे. मात्र, महावितरणकडून कृषी पंपांना केवळ आठ तास वीजपुरवठा केला जात असल्याने संपूर्ण क्षेत्राला वेळेत पाणी देणे शक्य होत नाही. धानासारख्या नियमित पाण्याची आवश्यकता असलेल्या पिकांसह सोयाबीन व कापूस ही पिकेही वाढीच्या महत्त्वाच्या टप्प्यावर असून सिंचनात होणारा विलंब उत्पादनात मोठी घट घडवून आणू शकतो, असे आ.सुधीर मुनगंटीवार यांनी निदर्शनास आणून दिले आहे.

शेतकऱ्यांनी बियाणे, खते, औषधे, मशागत, मजुरी आणि सिंचनासाठी मोठ्या प्रमाणावर खर्च केला आहे. त्यामुळे आता त्यांच्या पिकांचे संरक्षण करणे ही शासनाचीही जबाबदारी असल्याचे नमूद करत आ. मुनगंटीवार यांनी खरीप हंगाम संपेपर्यंत चंद्रपूर जिल्ह्यातील सर्व कृषी पंपांना विशेष बाब म्हणून २४ तास अखंड वीजपुरवठा उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे.

यासोबतच महावितरण कंपनीला आवश्यक अतिरिक्त वीज उपलब्ध करून देण्याबाबत तातडीने निर्देश देण्यात यावेत, कृषी वीजपुरवठा कमी दाबाचा किंवा वारंवार खंडित होणार नाही याची दक्षता घ्यावी, ऊर्जा विभाग, महावितरण आणि जिल्हा प्रशासन यांच्या समन्वयातून विशेष नियंत्रण कक्ष स्थापन करून वीजपुरवठ्यावर सातत्याने देखरेख ठेवावी, तसेच चंद्रपूर जिल्ह्याला विशेष कृषी वीजपुरवठा जिल्हा म्हणून घोषित करून शेतकऱ्यांना कोणत्याही अडचणीशिवाय सिंचन करता येईल, अशी व्यवस्था करण्यात यावी, अशीही मागणी आ.मुनगंटीवार यांनी केली आहे.

वेळेवर सिंचनाची सुविधा उपलब्ध झाल्यास हजारो हेक्टरवरील पिके वाचतील, शेतकऱ्यांचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान टळेल आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेलाही मोठा आधार मिळेल. शेतकरी सक्षम राहिला तरच कृषी आणि ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत राहील, असे नमूद करत शेतकरीहिताचा विचार करून चंद्रपूर जिल्ह्यासाठी २४ तास अखंड वीजपुरवठ्याचा निर्णय तातडीने घेण्याची मागणी आ. सुधीर मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री यांच्याकडे केली आहे.

महाराष्ट्र विधानसभा

# सुधीर मुनगंटीवार

विधानसभा सदस्य, बल्लारपूर, जि. चंद्रपूर

7722074199
Sudhir.Mungantiwar
sudhir.mungantiwar
www.sudhirmungantiwar.com
@SMungantiwar.com
SudhirMungantiwar
sudhirbhau.mungantiwar@gmail.com
bjp03069@gmail.com

जावक क्रमांक : 6653 /ऑगस्ट/२०२६ दिनांक : 03/08/२०२६

प्रति,

**मा. ना.श्री. देवेंद्रजी फडणवीस**
**मुख्यमंत्री तथा उर्जा मंत्री**
**महाराष्ट्र राज्य.**

**विषय :-** चंद्रपूर जिल्ह्यातील कृषी पावसाची परिस्थिती लक्षात घेता खरीप हंगाम संपेपर्यंत कृषी पंपांना विशेष बाब म्हणून 24 तास अखंड वीजपुरवठा उपलब्ध करून देण्याबाबत.

**महोदय,**

चंद्रपूर जिल्हा हा राज्यातील प्रमुख कृषिप्रधान जिल्ह्यांपैकी एक असून जिल्ह्यातील बहुतांश नागरिकांचा प्रमुख व्यवसाय शेती आहे. धान, सोयाबीन, कापूस, तुर व इतर खरीप पिकांवर जिल्ह्यातील लाखो शेतक-यांची उपजीविका अवलंबून आहे. यावर्षी चंद्रपूर जिल्ह्यात मान्सूनचे आगमन वेळेत झाले असले तरी अपेक्षित प्रमाणात पाऊस झालेला नाही. अनेक भागात पावसाचा मोठा खंड पडल्याने जमिनीतील ओलावा झपाट्याने कमी झाला आहे. अनेक शेतक-यांच्या शेतातील धान, सोयाबीन व कापूस पिके पाण्याअभावी करपून लागली असून उत्पादनावर गंभीर परिणाम होण्याची भीती निर्माण झाली आहे.

सध्या जिल्ह्यातील शेतक-यांसाठी कृषी विद्युत पंपाद्वारे सिंचन हाच एकमेव पर्याय उपलब्ध आहे. मात्र, महावितरणकडून कृषी पंपांना सध्या दिवसाचा केवळ ८ तास वीजपुरवठा केला जात आहे. हा कालावधी अपुरा असल्याने शेतक-यांना संपूर्ण क्षेत्राला पाणी देणे शक्य होत नाही. परिणामी अनेक शेतांमध्ये पिकांना वेळेवर पाणी मिळत नसल्याने पिके धोक्यात आली आहेत. चंद्रपूर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर धान लागवड केली जाते. धान पिकाला नियमित पाण्याची आवश्यकता असते. त्याचप्रमाणे सोयाबीन व कापूस ही पिकेही वाढीच्या अत्यंत महत्वाच्या अवस्थेत आहेत. या अवस्थेत सिंचनात झालेला विलंब उत्पादनात मोठी घट घडवून आणू शकतो. शेतक-यांनी बियाणं, खत, औषधे, मजुरी, मशागत व सिंचनासाठी मोठ्या प्रमाणावर खर्च केलेला आहे. आता पिके वाचविण्यासाठी पुरेशा वीजपुरवठ्याची अत्यंत आवश्यकता आहे.

राज्य शासनाने शेतकरीहितासाठी अनेक महत्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. त्याच अनुषंगाने चंद्रपूर जिल्ह्यातील विद्यमान दुष्काळसदृश परिस्थितीचा विचार करून विशेष उपाययोजना करणे अत्यंत आवश्यक आहे. आज शेतक-यांना नुकसान पिके वाचविण्यासाठी पाणी आणि त्यासाठी आवश्यक वीज अधिक महत्वाची आहे. वेळेवर सिंचन झाले तर हजारो हेक्टरवरील पिके वाचू शकतात आणि शेतक-यांचे कोटयवधी रुपयांचे नुकसान टाळता येऊ शकते.